# विदयार्थी विकास विभाग

## शैक्षणिक वर्ष 2018-2019 चा वार्षिक अहवाल

**कबचौ,उ.म.विदयापीठ** अंतर्गत विदयार्थी **विकास** विभागामार्फत राबविण्यात येणा-या व **स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालयाने** सहभाग घेतलेल्या विविध उपक्रमांचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष **2018-2019** मधील विदयार्थी विकास विभागाची प्रथम सभा मा.प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली **दि.29/6/2018** रोजी घेण्यात आली. सभेत मागील शैक्षणिक वर्षाचा कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच मागिल वर्षी विभागा मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांचा यशस्वीतेबाबत समाधान व्यक्त् करुन नुतन शैक्षणिक वर्ष असेच उपक्रम राबवावेत असे मत व्यक्त् करण्यात आले. तसेच विदयार्थी हित लक्षात घेता विदयापीठा मार्फत गरीब होतकरु विदयार्थ्याना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांचे अर्ज मागविण्याचे परवानगी देण्यात आली. त्याच प्रमाणे विदयापीठ स्तरीय विविध कार्यशाळा, अविष्कार,युवारंग इ.सारख्या उपक्रमात जास्तीत जास्त् विदयार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा कला गुणांना वाव मिळावा असे ठरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष **2018-2019** मध्ये विदयार्थी कल्याण विभागा मार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

1- कमवा व शिका महाविदयालयात गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या कमवा व शिका योजने साठी विदयापीठ परीपत्रकानुसार आठ विदयार्थ्याची निवड करण्यात आली. त्यास मा.प्राचार्यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करुन विदयापीठाकडे पाठविण्यात आला. या उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांनी महाविदयालय परीसरात बाबकाम ,रोपलागवड,झाडांना पाणी देणे ,परीसर स्वच्छता ,ग्रथालयीन कामे ,विज्ञान विभागातील प्रयोगशाळा स्वच्छता,कार्यालयीन उपयुक्त् कामे इ.कामकाज केले.त्यांचा कामाचा मेहनाताना म्हणुन **1,12,680**/- रुपये विदयार्थ्यांच्या खात्यावर टाकण्यात आले.

2- आर्थिक दुर्बल घटक विदयापीठामार्फत अपंग,अनाथ,गरीब विदयार्थ्यांसाठी देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी महाविदयालयातील **16** विदयार्थ्यांची निवड करण्यात येवुन तसा प्रस्ताव विदयापीठ विदयार्थी कल्याण विभागात पाठविण्यात आला. या योजनेखाली मागील वर्षी **15** विदयार्थ्यांना विदयापीठाकडुन **47,000**/- रुपये मंजुर झाले होते.

3- **आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा** -शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विदयापीठ परीपत्रकानुसार महाविदयालयाने 02 कार्यशाळा आयोजनासाठीचे प्रस्ताव विदयापीठाकडे सादर केले . त्यात युवती व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा व जागतिक तापमानवाढ कार्यशाळा यांचा आयोजनास विदयापीठाने परवानगी दिली .

**युवतीसभा- शुक्रवार दि. 12 ऑक्टोबंर 2018** रोजी महाविदयालयात युवती सभा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत सात महाविदयालयाच्या 79 विदयार्थीनीं सहभागी झाल्या त्यात सि.गो.पाटील महाविदयालय साक्री, विमलबाई महाविदयालय,साक्री,,,उत्तमराव पाटील महाविदयालय दहिवेल,एनएनसी महाविदयालय ,कुसुंबा, आदर्श महाविदयालय, निजामपुर, कर्मवीर अ.मा.पाटील महाविदयालय,पिंपळनेर, व म्हसदी महाविदयालयाच्या विदयार्थीनींचा सहभाग होता. या कार्यशाळेत **04** व्याख्यात्यांनी विदयार्थींनीना अनमोल असे मार्गदर्शन केले.

**जागतिक तापमानवाढ कार्यशाळा- शुक्रवार दि.**25/01/2019 रोजी महाविदयालयात एक दिवसीय जागतिक तापमानवाढ कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. या कार्यशाळेत विविध महाविदयालयातील **78** विदयार्थी सहभागी झाले. त्यांना प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील , प्रा.(डॉ.)संजय सोनवणे, प्रा.डॉ.डी.एस.जैन , विदयार्थी विकास विभागाचे जिल्हा समनवयक प्रा.डॉ.एच.एम.शेख सिनेट सदस्य् कबचौ,उमवि, जळगांव येथील प्रा.नितीन ठाकुर यांनी मार्गदर्शन केले.

4- **विविध उपक्रमात सहभाग-** विदयापीठ पुरस्कृत व विदयार्थी कल्याण विभाग आयोजित विविध महाविदयालयातील कार्यशाळामध्ये महाविदयालयातील विदयार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात होता. या कार्यशाळांसाठी महाविदयालयाने **रु.30,000/-** प्रवास खर्च केला. त्यात युवारंग,अविष्कार ,युवतीसभा ,साहस कार्यशाळा,जागतिक तापमानवाढ कार्यशाळा ,मैत्री कार्यशाळा,पोवाडा गायनकार्यशाळा ,आपतकालीन कार्यशाळा इ. कार्यशाळांमध्ये विदयार्थी सहभागी झाले त्याचा आलेख पुढील प्रमाणे आहे.

## विविध कार्यशाळेत सहभागी विदयार्थी संख्या

| **अ.क्र** | **उपक्रम** | **विदयार्थी संख्या** | **ठिकाण** |
|---|---|---|---|
| 01 | युवारंग | 02 | कुसूंबा महाविदयालय |
| 02 | अविष्कार | 02 | धुळे (जिल्हास्तरीय) |
| 03 | युवती सभा-3 | 35 | म्हसदी,निजामपुर,कुसुबा,साक्री |
| 04 | मैत्री कार्यशाळा | 06 | सरदार पटेल महा.ऐनपुर |
| 05 | साहस कार्यशाळा | 06 | कला,शास्त्र व वाणिज्य महा.चोपडा |
| 06 | जागतिक तापमानवाढ कार्यशाळा | 40 | म्हसदी,निजामपुर,कुसुबा,साक्री |
| 07 | रोजगार व व्यवसाय | 06 | सी.गो.पाटील महा.साक्री |

| | | | |
|---|---|---|---|
| | मार्गदर्शन कार्यशाळा | | |
| 08 | श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा | 06 | आ.मा.पाटील महा.पिंपळनेर |
| 09 | सुत्रसंचालन कौशल्य कार्यशाळा | 04 | आर.सी.पटेल महा.शिरपुर |
| 10 | आपतकालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळा | 06 | समाजकार्य महाविद्यालय चोपडा |
| | एकुण | 113 | |

## आयोजित कार्यशाळा

| अ.क्र | उपक्रम | विदयार्थी संख्या | कालावधी |
|---|---|---|---|
| 01 | युवती व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा | 79 | 12/10/2018 |
| 03 | जागतिक तापमानवाढ कार्यशाळा | 78 | 25/01/2019 |
| | एकुण | 157 | |

विदयार्थी विकास विभागाच्या अशा विविध उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी विविध महाविदयालयात तज्ञ प्राध्यापकाबरोबरच संस्थेचे अध्यक्ष मा.दादासो.डॉ.संजयकुमार आर.देवरे ,सचिव मा.ताईसो.डॉ.संजिवनी संजय देवरे,संचालक मंडळ,धनदाई तरुण ऐक्यमंडळ ,संयोजन समिती सदस्य,प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ,आजी-माजी विदयार्थी इ.अनमोल मार्गदर्शन सहकार्य मोठया प्रमाणाल लाभले. त्यामुळे विदयापीठाने दाखविलेला विश्वास महाविदयालयाने यशस्वी केला .

**डॉ.शिंदे विशाल नारायण**
**विद्यार्थी विकास अधिकारी**

**प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील**